# वसई-विरार शहर महानगरपालिका
## निवडणूक विभाग

दि.२६/०७/२०२२

**प्रेसनोट**

# जाहीर सूचना

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०२२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मा.राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशाप्रमाणे निवडणूक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या सन २०२२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत काढणे, तसेच आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करण्यासाठी कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

सदर **आरक्षण सोडत** दिनांक २९/०७/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा. पद्मश्री भाऊसाहेब वर्तक हॉल, विरार रेल्वे स्थानकाजवळ, विरार (प.) येथे आयोजित करण्यात आली असून दिनांक ३०/०७/२०२२ रोजी **आरक्षणाचे प्रारूप** प्रसिद्ध करण्यात येईल. सदर आरक्षणाबाबत मुख्य निवडणूक कार्यालय, मुख्यालय, विरार(पूर्व) तसेच महानगरपालिकेच्या सर्व ९ प्रभाग समिती कार्यालयांमध्ये शनिवार दि.३०/०७/२०२२ **ते** मंगळवार दि.०२/०८/२०२२ (दुपारी ०३.०० वाजेपर्यंत) या कालावधीत नागरिकांना **हरकती व सूचना** सादर करता येतील.

**निवडणूक विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**